# थेऊरचा श्री चिंतामणी

**सर्व चिंतांची होई याच्यापाशी समाप्ती...अशी आहे श्री चिंतामणीची ख्याती...**



## श्री क्षेत्र थेऊर :

पुणे जिल्ह्यात पुणे-सोलापूर महामार्गाला जोडलेल्या रस्त्यावर हवेली तालुक्यात थेऊर हे गाव आहे. ते पुण्यापासून हे ३० कि.मी. अंतरावर आहे. थेऊर गाव चिंतामणीस इनाम आहे. या गावची सनद औरंगजेबाने दिलेली आहे.

## महिमा :

क्षिप्त, मुढ, विक्षिप्त, एकाग्र आणि निरोधक अशा मनाच्या पाच भुमिका आहेत त्यांना प्रकाशित करतो तो चिंतामणी. चिंतामणीच्या भजनाने मनःशांतीचा लाभ होतो असे मुदगल पुराणात सांगितले आहे.

## चिंतामणीचे देवालय :

अष्टविनायकांपैकी थेऊरचा श्री चिंतामणी हा दुसरा गणपती आहे. थेऊरच्या कदंब वृक्षाखाली हे श्री गणेशाचे ठिकाण आहे. श्री चिंतामणीचे मंदिर भव्य असून मंदिराच्या आवारात एक मोठी घंटा आहे. मंदिराचे महाद्वार उत्तरभिमुख आहे पण मूर्ती मात्र पूर्वाभिमुख आहे. मंदिराचे आवार प्रशस्त असून सभामंडपही मोठा आहे. मंदिराच्या भोवताली ओवऱ्या आहेत. महाद्वारापासून नदीपर्यंत दगडी सडक पेशव्यांनी बांधली आहे. देवळाच्या तिन्ही बाजूंना मुळा व मुठा या दोन नद्यांचा वेढा आहे. येथे नदीला बाराही महिने पाणी असते. नदीच्या डोहाला 'चिंतामणितीर्थ' असे म्हणतात. थोरले माधवराव पेशवे या गणपतीच्या दर्शनाला वारंवार येत असत. त्यांनी आपल्या काळात या मंदिराचा सभामंडप बांधला. मंदिराच्या आवारात थोरल्या माधवरावांची स्फूर्तिदायक कारकीर्द दाखवणारे कलात्मक दालन आहे.

## श्री चिंतामणीची मूर्ती :

थेऊर येथील श्री चिंतामणीची मूर्ती स्वयंभू आहे. लोभस अशा या गणेशाला डाव्या बाजुला सोंड असून तो पूर्वाभिमुख आहे. मांडी घातलेले आसन आहे. गणेश मूर्तीच्या मागे चांदीची सुंदर महिरप आहे.

## नैमित्तीक उत्सव :

भाद्रपद शुक्ल चतुर्थीचा उत्सव मोठया प्रमाणावर साजरा केला जातो.

## इतिहास :

भक्तांच्या चिंतेचे हरण करणारा म्हणून याला चिंतामणी म्हणतात. पुणे नजिकच्या चिंचवड येथील मोरया गोसावी या तपस्वी पुरुषाने या ठिकाणी गणपतीची उग्र तपश्चर्या केली होती. त्यांच्या तपश्चर्येमुळे प्रसन्न होऊन श्रीगणेश अवतीर्ण झाले; पण ते वाघाच्या रुपात! तो वाघ म्हणून एक पाषाण तेथे दाखविला जातो. मोरया गोसावी यांना येथे उपासना करुन सिद्धी प्राप्त केली होती असा ऐतिहासिक दाखला असून थेऊर येथील मंदिर मात्र मोरया गोसावी यांचे सुपुत्र चिंतामणी देव यांनी बांधले आहे.

थेऊर क्षेत्राला अलीकडे जे फार महत्त्व प्राप्त झाले आहे ते रमा-माधवांच्या म्हणजे थोरल्या माधवराव पेशवे व त्यांच्या साध्वी पत्नी रमाबाई यांच्या सानिध्यामुळे. पेशवे घराणे खूप मोठे गणेशभक्त होते. पुण्यातील पेशव्यांच्या घरातील अनेकजण थेऊरला सतत येत असत. माधवराव पेशव्यांची श्रीचिंतामणीवर विलक्षण भक्ती होती व राज्यकारभारातून वेळ मिळाला की ते मनःस्वाथ्य आणि शरिरस्वाथ्य साधण्याकरिता या ठिकाणी येऊन राहत. थेऊरचा विस्तार हा माधवराव पेशवे यांनी केला. क्षयरोगाशी झगडत असता त्यांच्या शेवटच्या दिवसात त्यांनी श्रीचिंतामणीच्या सहवासातच राहून शेवटी आपले प्राण देवाच्या चरणी सोडले आणि लागलीच रमाबाईसाहेब पतीबरोबर तेथेच सती गेल्या. त्या जागी आज सतीचे वृंदावन आहे. तेथे प्रतिवर्षी रमा-माधवांच्या पुण्यतिथीचा उत्सव कार्तिक वद्य ८ ला होतो.

# श्री चिंतामणीसंबंधी पौराणिक कथा :

अष्टविनायकांपैकी हे स्थान कशामुळे महत्त्वाला आले यासंबंधीच्या पुराणात तीन कथा आढळतात :

१) गणेशास चिंता मुक्त करणारे चिंतामणी हे नाव पडले ते चिंतामणी या रत्नामुळे. त्याची हकीकत अशी की...फार प्राचीन काळी अभिजित नावाचा एक राजा होता. त्याच्या पत्नीचे नाव गुणवती. सारे काही व्यवस्थित होते, पण राजाला पुत्रसंतान नव्हते. मग वैशंपायन नावाच्या ऋषींच्या आदेशानुसार राजा-राणीने वनात जाऊन तपश्चर्या केली. पुढें कालांतराने गुणवतीला एक पुत्र झाला. त्याचे नाव ठेवले गण. गण मोठा पराक्रमी होता, पण तितकाच तापट होता. एकदा तो कपिल मुनींच्या आश्रमात गेला. कपिलांच्याजवळ चिंतामणी रत्न हाते. त्या रत्नाच्या सामर्थ्याने कपिलने गणला भोजन घातले. गणराजाला ते रत्न हवे होते. पण कपिलाने ते देण्यास नकार दिला. तेव्हा गणराजाने ते हिरावून नेले; कपिलाला फार वाईट वाटले. मग त्याने दुर्गादेवीच्या आज्ञेनुसार विनायकाची आराधना केली. त्याचा भक्तीभाव पाहून प्रसन्न झालेल्या विनायकाने त्याचे गेलेले रत्न परत मिळवून देण्याचे कपिलाला वचन दिले.

पुढे विनायकाचे व गणराजाचे घनघारे युद्ध झाले. विनायकाने गणराजाला ठार मारले. तेव्हा त्याच्या पित्याने अभिजीताने ते चिंतामणी रत्न विनायकास परत दिले. विनायकाने ते कपिलाला परत दिले, परंतु, केवळ एका रत्नामुळे घडलेला प्रसंग पाहून कपिलमुनीनी ते रत्न स्वीकारण्यास नकार दिला. कपिलमुनींनी अर्पण केलेले चिंतामणी रत्न विनायकाने आपल्या गळयात धारण केले आणि तो चिंता हरणारा चिंतामणी विनायक या नावाने प्रसिद्ध झाला. ज्या कदंब वृक्षाखाली ही घटना घडली तेथेच तो वास्तव्य करु लागला. तो आजतागायत पुढे त्या कदंब वृक्षाच्या सभोवती एक गाव वसले. त्याचे नाव कदंबनगर. ते पुढे कदंबतीर्थ म्हणून प्रसिद्ध झाले. हे कदंबतीर्थ म्हणजेच सध्याचे थेऊर व तेथील विनायक तो चिंतामणी विनायक.

२) ऋषिपत्नी अहिल्येशी कपटाचरण करुन निंद्य कर्म केल्याबद्दल गौतम मुनींनी इंद्राला 'सर्वांगाला क्षते पडतील' असा शाप दिला. तेव्हा इंद्राने ऋषींचे पाय धरुन क्षमा मागितली. ऋषींनी मग त्याला श्रीगणेशाची षडाक्षरी मंत्राने तपःपूत होऊन आराधना करुन शापाच्या परिणामातून मुक्त होण्याचा मार्ग दाखवून दिला. गौतमाच्याच आदेशाने इंद्राने तपश्चर्या केली व तो शापमुक्त झाला. त्याचे शरीर पूर्वीप्रमाणेच सतेज झाले. इंद्राने ज्या ठिकाणी बसून तप केले व शापमुक्त झाला त्या ठिकाणी त्याने श्रीगणेशाची स्थापना केली व तेथील सरोवरास 'चिंतामणी' असे नाव दिले तेच हे क्षेत्र.

३) प्रजापती ब्रह्मदेवाच्या चित्ता चंचलता उत्पन्न झाल्यामुळे त्यांची परमेश्वरनिर्मित सृजनाची शक्ती कमी झाली. म्हणून ब्रह्मदेवाने आपल्या चंचल मनाला स्थिरता लाभावी, ते शांत व्हावे म्हणून श्रीगणेशाचे चिंतन व अनुष्ठान केले. त्यामुळे ब्रह्मदेवाच्या मनाची चंचल वृत्ती नाहीशी झाली व ते शांत व स्थिर झाले. ही सिद्धी त्यांना ज्या ठिकाणी प्राप्त झाली त्याला त्यांनी 'स्थावर क्षेत्र' असे नाव दिले व तेथे चित्तवृत्तीत प्रकाश पाडणाऱ्या 'चिंतामणी' श्रीगणेशाची स्थापना केली म्हणून या क्षेत्राला थेऊर असे नाव प्राप्त झाले.

थेऊर गावी चिंतामणी । देवेंद्रा जो वरदपाणी ।
गौतमाची शापवाणी । ज्याच्या कृपे आटली ।।



ब्रह्म सृष्ट्यादिसकतः स्थिरमतिरहीतः पीडीतो विघ्नसंधै ।
**आक्रांत भूतिरक्तः कृतिगुणरसजा जीवता त्युत्कुमिच्छुन ।।**
**स्वात्मानं सख्यभक्त गणपतिममलं सेव्याचिंतामणीयम ।**
**मुक्तश्चास्थापयतं स्थिरमतिसुखदं स्थावरे दुंढी मीडे ।। ५ ।।**

[अर्थात - सृष्टी निर्मात्या ब्रह्मदेवासारखे ज्याचे मन चंचल झाले आहे. जो अनेक संकटांमुळे त्रासलेला आहे, जो सुखाच्या, आनंदाच्या शोधात आहे. ज्याला स्वतःच्या कर्मांमुळे जीवनाच्या त्यागाची इच्छा होते त्याने ब्रह्मदेवाप्रमाणे थेऊर या क्षेत्रात असलेल्या स्थितचित्त आणि सुख देणाऱ्या चिंतामणी गणपतीची आराधना करुन आपल्या मनाची चंचलता नाहीशी करावी.]